**L. C. BILL No. III OF 2023.**

A BILL

TO PROVIDE FOR PAYMENT OF UNEMPLOYMENT ALLOWANCE TO UNEMPLOYED YOUTH IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३.**

**महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता देण्याबाबत तरतूद करण्याकरिता विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्यात शैक्षणिक पात्रतेप्रमाणे सेवायोजन कार्यालयाकडे ४५ लाख बेरोजगार युवक-युवतींची नोंद असून नोंदणीकृत नसलेल्या बेरोजगारांची संख्या कोट्यवधीच्या घरात असून ही संख्या दिवसेंदिवस वाढत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या बेरोजगारीमुळे अशा व्यक्तींचा व त्यांच्या कुटुंबियांचा मानसिक छळ होत आहे. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ येऊन त्यांचे जीवनमान निकृष्ट दर्जाचे झाले आहे. तसेच अनेक प्रकरणी त्यांना उपजिविकेसाठी शैक्षणिक पात्रता, शारीरिक क्षमता असूनही कमी क्षमतेची कामे करावी लागत असतात त्यामुळे त्यांनी अवैध मार्गांचा अवलंब केला आहे ;

(शा.म.मु.) एचबी-२७२२—१ (२००—३-२०२३)

**आणि ज्याअर्थी,** अशा व्यक्तींना नोकरी मिळेपर्यंत त्यांच्या किमान गरजा भागविता येणे शक्य व्हावे यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य मंजूर करणे इष्ट आहे. **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौऱ्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता अधिनियम, २०२३ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यात लागू असेल.

(३) तो ताबडतोब अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित असेल तर, —

(क) " बेराजगार व्यक्ती " याचा अर्थ,–

(१) रोजगार नसलेली परंतु रोजगार मिळण्यास पात्र असलेली व्यक्ती ;

(२) रोजगार मिळविण्यासाठी उत्सुक असलेली ही व्यक्ती शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावी. तिची समाजातील प्रचलित वेतन दरावर काम करण्याची इच्छा असावी ;

(३) रोजगार मिळविण्यासाठी आवश्यक ते प्रयत्न केल्यानंतरही रोजगार न मिळालेल्या व्यक्तीला " बेरोजगार " म्हणता येईल.

(ख) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ग) " नियम " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेले नियम, असा आहे ;

बेरोजगारी भत्ता मिळण्यासाठी पात्रता.

**३.** या अधिनियमान्वये, खालील बेरोजगार व्यक्ती बेरोजगारी भत्ता मिळण्यासाठी पात्र असतील :–

(१) बेरोजगार व्यक्ती महाराष्ट्र राज्याची रहिवासी असावी ;

(२) बेरोजगार व्यक्तीचे वय १८ वर्षापेक्षा कमी व ४० वर्षापेक्षा अधिक नसावे ;

(३) अर्जदार बेरोजगार व्यक्तीने राज्याच्या सेवायोजन केंद्रात आपले नाव नोंदविणे आवश्यक आहे आणि असे नाव नोंदणी झालेल्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत नोकरी मिळालेली नाही अशी व्यक्ती ;

(४) अर्जदार बेरोजगार व्यक्तीची किमान शैक्षणिक पात्रता १० वी/उच्च माध्यमिक / पदवीधर / पदवीधारक / पदव्युत्तर पदवीधर इतकी असावी ;

(५) अर्जदार बेरोजगार व्यक्तीच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा अधिक नसावे.

बेरोजगारी भत्ता देण्यासंदर्भातील योजना.

**४.** (१) या अधिनियमान्वये, पात्र बेरोजगार व्यक्तीला दरमहा रुपये पाच हजार इतका भत्ता देण्याबाबतची योजना राज्य शासनाच्या रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत तयार करण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) मधील नमूद योजना पुढील प्रमाणे असेल :–

(क) या योजनेची अंमलबजावणी करणेसाठी राज्य पातळीवर एक केंद्र व प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये एक शाखा स्थापन करण्यात येईल तसेच प्रत्येक तालुक्यात तहसील कार्यालयामध्ये एक उपशाखेची स्थापना करण्यात येईल ;

(ख) या योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी वर्ग 'अ', वर्ग 'ब', वर्ग 'क' व वर्ग 'ड' श्रेणीमधील अधिकारी, कर्मचारी यांची नियुक्ती करणेची तरतूद असेल.

बेरोजगारी भत्ता शाखेची कार्य.

**५.** बेरोजगारी भत्ता शाखेमार्फत :-

(१) बेरोजगारी भत्यासाठी आलेले अर्ज स्विकारण्यात येतील व त्यात नमूद बेरोजगार व्यक्ती भत्ता मिळण्यासाठी पात्र आहे किंवा कसे याबाबत तपासणी करण्यात येईल.

(२) जिल्ह्याच्या सेवायोजन विभागात ज्यांच्या नावांची नोंदणी झाली आहे व नाव नोंदणी दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत ज्यांना नोकरी मिळाली नाही अशा बेरोजगार व्यक्तींची यादी प्राप्त करून घेण्यात येईल.

(३) ज्यांना जिल्ह्यातील सेवायोजन केंद्रामार्फत सरकारी किंवा खाजगी क्षेत्रात नोकरी देण्यात आलेली आहे अशा व्यक्तींची यादी प्राप्त करून घेण्यात येईल.

(४) जिल्ह्यामध्ये खाजगी कंपन्या/सहकारी संस्थामध्ये ज्यांची नियुक्ती केली आहे अशा व्यक्तींची यादी प्राप्त करून घेण्यात येईल.

(५) उपरोक्त महितीच्या आधारे जिल्ह्यातील बेरोजगार व्यक्तींची अद्यायवत यादी तयार करण्यात येईल.

(६) जिल्ह्यातील बेरोजगारी भत्ता मिळण्यासाठी पात्र असणाऱ्या व्यक्तींची यादी आवश्यक त्या तपशीलासह जिल्हा केंद्राकडे पाठविण्यात येईल.

बेरोजगारी भत्ता केंद्राची कामे.

**६.** बेरोजगारी भत्ता केंद्रामार्फत :-

(१) तालुका व जिल्हा बेरोजगारी भत्ता शाखांनी पाठविलेल्या यादीची तपशीलाच्या आधारे छाननी करण्यात येईल व बेरोजगारी भत्त्याच्या मंजूरीसाठी प्रस्ताव तयार करून राज्य शासनाकडे पाठविण्यात येईल.

(२) रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडून प्रस्ताव मान्य झाल्यानंतर ज्यांना बेरोजगार भत्ता देण्यात येईल, अशा व्यक्तींची नावे संबंधित जिल्हाधिकारी / तहसिलदारांना कळविण्यात येईल.

बेरोजगारी भत्ता मिळणेस पात्र व्यक्तींची यादी करणे.

**७.** रोजगार व स्वंयरोजगार विभाग बेरोजगारी भत्ता मिळण्यासाठी पात्र व्यक्तींची नावे निश्चित करेल व बेरोजगारी भत्त्यांसंदर्भात केंद्राला कळवेल.

बेरोजगारी भत्ता देणे.

**८.** कलम ३ मधील सर्व अटी व शर्ती पूर्ण करणाऱ्या बेरोजगार व्यक्तीला कमीत कमी पाच हजार रुपये इतक्या रकमेचा बेरोजगारी भत्ता देण्यात येईल.

बेरोजगारी भत्ता मिळणे बंद होणे.

**९.** बेरोजगारी भत्ता मिळणाऱ्या प्रत्येक बेरोजगार व्यक्तीला नोकरी मिळाल्यानंतर त्वरीत तालुक्यातील/ जिल्ह्यातील बेरोजगारी भत्ता शाखेला तसे कळविणे बंधनकारक असेल व त्यानंतर अशा व्यक्तीला कलम ४ अन्वये मंजूर करण्यात आलेला भत्ता प्रदान करणे बंद करण्यात येईल.

बेरोजगारी भत्ता अधिनियम उल्लंघन केल्यास करावयाची कार्यवाही.

**१०.** प्रस्तुत अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करून जी कोणतीही व्यक्ती बेरोजगार भत्ता मिळवित असेल अशा व्यक्तीस ३ वर्षापर्यंत कारावासाची किंवा ५० हजार रुपयापर्यंत असू शकेल एवढ्या द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही स्वरूपाची शिक्षा मिळेल.

नियम करण्याचा अधिकार.

**११.** (१) राज्य शासनास राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) ह्या अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असतांना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रितीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्यांच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर, असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्या गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे

बेरोजगारी ही जगासमोरील एक ज्वलंत समस्या बनली आहे. त्यामुळे प्रगतशील व विकसनशील देशामध्ये बेरोजगारीचे प्रमाण वाढत आहे. निती आयोगाने नुकताच एक आराखडा जाहीर केला होता. या कृती आराखड्यामध्ये शासनाकडे अनेक प्रस्ताव देण्यात आले. देशातील ग्रामविकास, संरक्षण, कृषी,आरोग्य, शिक्षण, रेल्वे, रस्ते आणि भांडवली खर्चाच्या गुंतवणुकीत वाढ करणेबरोबर देशात सध्या वाढत असलेल्या बेरोजगारीवर सुध्दा उपाययोजना करणे गरजेचे आहे. राज्यात जवळपास ४५ लाख व्यक्ती सेवायोजना कार्यालयाकडे नोंदणीकृत बेरोजगार असून नोंदणीकृत नसलेल्या व्यक्तींची संख्या कोट्यवधीच्या घरात आहे. बहुतांशी कुटुंबातील व्यक्तींना रोजगार नसल्यामुळे त्यांना हालाखीचे जीवन जगावे लागत आहे.

राज्यातील बेकारीचे भयानक प्रमाण व त्यांचा परिणाम म्हणून बेरोजगार व्यक्तींना सोसाव्या लागणाऱ्या हाल अपेष्टा लक्षात घेता त्यांना कोणता तरी नियमित रोजगार मिळेपर्यंत अशा व्यक्तींना नियमित अर्थिक सहाय्य देणे आवश्यक आहे. भारतात दरवर्षी १ कोटी ६० लाख तरूण नोकरीच्या शोधात बाहेर पडत असतात. परंतु त्यात फक्त १५ ते २० लाख नोकऱ्यांची निर्मिती होत असते असे गंभीर चित्र देशात आहे.

सेंटर फॉर मॉनिटरींग इंडियन इकॉनॉमी या संस्थेने केलेल्या पाहणीमध्ये बेकारीचे भयानक चित्र स्पष्ट करण्यात आले आहे. दरवर्षी अनेक तरुण-तरुणी शिक्षण पूर्ण करून बाहेर पडत असतात. त्यामध्ये पदवीधारकाप्रमाणे, उच्चशिक्षित विद्यार्थीही असतात. उच्च पदव्या घेतलेल्या विद्यार्थ्यांना जेव्हा नोकरी मिळत नाहीत तेव्हा ते हताश होतात. अशा परिस्थितीत नोकरी शोधून हताश झालेले तरुण समाजासाठी घातक ठरू शकतात. शिक्षण पूर्ण करुन बाहेर पाडलेल्या मुलांना नोकरी मिळत नाही त्यांनाच खऱ्या अर्थाने बेरोजगार समजले गेले पाहिजे. राज्यातील बेरोजगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असून एखाद्या बेरोजगार व्यक्तीला उद्योगधंदा करणेसाठी आर्थिक परिस्थिती नसते, लहान सहान नोकरीसुध्दा मिळत नाही. अशी व्यक्ती गुन्हेगारी क्षेत्राकडे सहज वळू शकते. अशा बेरोजगारांना बेरोजगारी भत्ता देणेबाबत मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये योजना कार्यान्वित आहे. बेरोजगारी भत्ता पुरविणारी एक योजना आधी पासून अस्तित्वात आहे. परंतू तिची व्याप्ती खूप मर्यादित आहे व ती राज्यातील बेरोजगारांच्या गरजा भागविण्यास अपूरी असल्याचे सिध्द झाले आहे. जो बेरोजगार व्यक्ती वयाची १८ वर्ष पेक्षा लहान नाही व ४० वर्षापेक्षा मोठा नाही अशा व्यक्तींना केंद्र अथवा राज्य शासनाकडून अथवा उपक्रमाकडून कोणत्याही प्रकारचा बेरोजगारी भत्ता मिळत नाही. अशा बेरोजगार व्यक्तींना दरमहा रुपये ५०००/- इतका बेरोजगारी भत्ता देण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी वर नमूद केलेले उद्दीष्ट साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

वर नमूद केलेले उद्दीष्टे साध्य करणे हा विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १७ जानेवारी, २०२३.

**अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक ३.]**

**[महाराष्ट्र राज्यातील बेरोजगार युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता देण्याबाबत तरतूद करण्याकरिता विधेयक.]**

**[श्री. अंबादास दानवे,**
प्रभारी सदस्य.**]**

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.